# महाराष्ट्र विधानसभा

**चौथे अधिवेशन, २०२२**

**सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२**

## ग्रामविकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ३२**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एल-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५३, जिल्हा प्रशासन**<br>**बाब क्रमांक: २२०, रूपये:- ३,८६,८२,०००/-**<br>**श्री. बळवंत वानखडे,ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (१) | ४५५५ | १० | राज्यात मोठ्या प्रमाणात ग्रामपंचायत सरपंच गावातील विकासासाठी सतत झटत आहेत. तालुका आणि जिल्हा स्तरावर गावातील विकासाच्या कामाचा वारंवार पाठपुरावा करताना मोठ्या प्रमाणात त्यांची दमछाक होते. ग्रामपंचायत सरपंच व सदस्यांना कोणत्याही प्रकारचे भत्ते व वैद्यकीय सेवा अनुज्ञेय नाही. शासनामार्फत ग्रामपंचायत सरपंच आणि सदस्यांना अत्यंत तुटपुंजे मानधन असून विविध सरपंच संघटनेमार्फत त्यांचे मानधन वाढवण्याकरिता वारंवार मागणी होत असून राज्यातील ग्रामपंचायत सरपंचांना किमान १०००० आणि सदस्यांना ५००० प्रती महिना वेतन देण्यात यावे. तसेच ग्रा. प. कर्मचाऱ्यांना शासनाच्या चतुर्थ श्रेणीचा लाभ देण्याच्या दृष्टीन करावयाची कार्यवाही. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४१५, कृषिविषयक संशोधन व शिक्षण**<br>**बाब क्रमांक: २२२, रूपये:- २,०३,५२,०००/-**<br>**श्री. संजय जगताप** |
| (२) | ४७१८ | १० | श्री. संत जनाबाई ग्रामीण विकास महिला मंडळ, सिरसण, ता. पालन, जिल्हा परभणी येथे असून ग्रामविकास विभागा अंतर्गत विद्यार्थ्यासाठी सोसीव सुविधा राबवित असणे, विद्यार्थ्यासाठी सन २०१६-२०१७याआर्थिक वर्षात बंदिस्त प्रेक्षागृह बांधण्यासाठी राबविली जात असणे, सभागृहाचे बांधकाम ७५ % टक्के पूर्ण झाले असणे, मात्र उर्वरित २५% टक्क काम निधी अभावी अपूर्ण अवस्थेत असणे, सभागृहाचे बांधकाम पूर्ण करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, संबंधित अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत असणे, परिणामी स्थानिक जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष उर्वरित काम पुर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (३) | ४६९७ | १० | श्री. संत जनाबाई ग्रामीण विकास महिला मंडळ, सिरसण, ता. पालन, जिल्हा परभणी येथे असून ग्रामविकास विभागा अंतर्गत विद्यार्थ्यासाठी सोसीय सुविधा राबवित असणे, विद्यार्थ्यासाठी सन २०१६-२०१७याआर्थिक वर्षात बंदिस्त प्रेक्षागृह बांधण्यासाठी राबविली जात असणे, सभागृहाचे बांधकाम ७५ % टक्के पूर्ण झाले असणे, मात्र उर्वरित २५% टक्क काम निधी अभावी अपूर्ण अवस्थेत असणे, सभागृहाचे बांधकाम पूर्ण करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, संबंधित अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | असणे, परिणामी स्थानिक जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष उर्वरित काम पुर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५१५, इतर ग्रामीण विकास कार्यक्रम**<br>**बाब क्रमांक: २२६, रूपये:- १९,५४,३२,००,०००/-**<br>**श्री. छगन भुजबळ** |
| (४) | ४६२३ | १०० | राज्यातील २५ जिल्हापरिषद, २८४ पंचायत समित्या आणि ८२०ग्रामपंचायतींमध्ये प्रशासकीय कारकीर्द सुरु असल्यामुळे या स्थानिक स्वराज्य संस्थांना पंधराव्या वित्त आयोगाचा निधी न देण्याची केंद्र शासनाने भूमिका घेतलेली असणे, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीपासून वंचित राहिल्यामुळे राज्य शासनाला २०० कोटींचा फटका बसलेला असणे, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना १५ व्या वित्त आयोगाचा निधी मिळण्यासाठी राज्य शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५१५, इतर ग्रामीण विकास कार्यक्रम**<br>**बाब क्रमांक: २२७, रूपये:- १,००,००,००,०००/-**<br>**ॲड. माणिकराव कोकाटे** |
| (५) | ४६०९ | १० | ग्रामीण भागातील मुलभूत सुविधा व विविध विकास कार्यक्रम अंतर्गत लेखाशीर्ष २५१५-१२३८ मध्ये सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात स्थानिक लोकप्रिनिधींच्या सिन्नर विधानसभा मतदार संघातील मंजूर कामांना शासनाने दिनांक १९ जुलै २०२२ रोजी स्थगिती दिलेली असणे सदरची कामे ही जनतेच्या मुलभूत सुविधांच्या विकासाची असताना या कामांची स्थागिती न उठविता सदरची कामे शासनाने दिनांक १२ऑक्टोबर २०२२ रोजी रद्द केलेली असणे, ही कामे नागरिकांच्या हिताची व मुलभूत सोयी सुविधांची असल्याने ती दिनांक १२ ऑक्टोबर २०२२ रोजी रद्द केल्याने नागरिकांना विकासापासून वंचित राहण्याची वेळ येणे, परंतु सदरची कामे रद्द केल्याने नागरिकांमध्ये शासना विषयी असंतोष निर्माण होणे तरी सदरच्या कामांना पुन:प्रशासकीय मान्यता देणेची असलेली आवश्यकता त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्रीमती सुलभा खोडके** |
| (६) | ४५५२ | १० | राज्यात जिल्हा परिषदेच्या माध्यमातून वैयक्तिक लाभाच्या योजना राबवल्या जात असून या योजना डीबीटी मार्फत राबवल्या जात असून, अमरावती जिल्हा परिषदेने दिनांक १ एप्रिल २०२२ पासून सुरू झालेल्या नवीन आर्थिक वर्षातील पाच महिन्याचा कालावधी संपला तरी या योजनेच्या लाभार्थींपर्यंत डीबीटीचा लाभ पोहोचविला नसल्याने पसरलेली तीव्र असंतोषाची भावना ,याबाबत चौकशी करून योजनेचा लाभ लाभार्थ्यांना मिळण्याबाबत राज्य शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (७) | ४५५३ | १० | अमरावती येथे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत जिल्हयात सुमारे ६० हजार घरे बांधण्यात आली असून त्यासाठी अंदाजे ७२० कोटी रुपये इतके खर्च करण्यात येणे,अजूनही प्रपत्र ब मधील १०३३ आणि प्रपत्र ड मधील १७४५ अशा एकूण २७७७ लाभार्थ्यांना शासनाचे अनुदान मिळालेले नसणे त्यामुळे लाभार्थ्यात पसरलेला तीव्र असंतोष, यासंदर्भात शासनाने चौकशी करून सदर लाभार्थ्यांना त्यांचे अनुदान तातडीने अदा करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. मनोहर चंद्रिकापूरे** |
| (८) | ४६६९ | १० | अर्जुनी मोरगांव विधानसभा क्षेत्र गोंदिया हा ग्रामीण विधानसभा क्षेत्र असणे, या मतदार संघात मुलभूत सुविधा व विकास कामांसाठी निधी अपुरा पडत असणे, २५१५ लेखाशिर्ष अंतर्गत निधीची आवश्यकता असणे वारंवार मागणी करुनही निधी न मिळणे, त्यामुळे मतदार संघात असमतोल विकास होणे, यासाठी निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यासाठी करावयाची कार्यवाही. |
| | | | **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (९) | ४६८० | १०० | अमरावती जिल्हयातील अमरावती, तिवसा, भातकुली व मोर्शी या तालुक्यातील भागातील ग्रामविकास विभागा मार्फत मंजूर करण्यात आलेल्या २५१५ योजने अंतर्गत मंजुर निधीला माहे जुलै, २०२२ ला स्थगीती दिलेली आहे. ग्रामीण भागातील गावांचा विकास होण्याच्या दृष्टीने मंजुर कामे होणे आवश्यक आहे. करीता राज्य शासनाने ऑगष्ट २०२२ तर २ डिसेंबर, २०२२ च्या दरम्यान राज्यतील अनेक जिल्हयातील रस्त्यांच्या कामावरील स्थगीती उठवून कामे पुर्ववत सुरु करण्याचे आदेश दिलेले आहे, त्याच धरतीवर अमरावती जिल्हयातील अमरावती, तिवसा, भातकुली व मोर्शी या तालुक्यातील भागातील २५१५ अंतर्गत विकास कामावरील स्थगीती उठवण्यात यावी. याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (१०) | ४६५१ | १०० | "ग्रामीण भागातील मूलभूत सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी महाविकास आघाडी सरकारच्या काळात मंजूर करण्यात आलेली सुमारे 850 कोटींची कामे ग्रामविकास विभागाने रद्द करण्याचा निर्णय घेतल्यामुळे राज्यातील ग्रामीण भागातील विकास कामांवर प्रतिकूल परिणाम झाल्यामुळे राज्यातील जनतेत शासनाबाबत निर्माण झालेली असंतापाची भावना, यासंदर्भात मंजूर झालेल्या कामांना प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता देऊन निविदा स्तरावर असलेली कामे तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता." |
| | | | **श्री. नितीन अर्जुन (ए.टी.) पवार** |
| (११) | ४६०८ | १० | ग्रामीण भागातील मुलभूत सुविधा व विविध विकास कार्यक्रम अंतर्गत लेखाशीर्ष २५१५-१२३८ मध्ये सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात स्थानिक स्थानिक लोकप्रतिनिधींच्या कळवण-सुरगाणा विधानसभा मतदार संघातील मंजूर कामांना शासनाने दिनांक १९ जुलै २०२२ रोजी स्थगिती दिलेली असणे सदरची कामे ही जनतेच्या मुलभूत सुविधांच्या विकासाची असताना या कामांची स्थागिती न उठविता सदरची कामे शासनाने दिनांक १२ऑक्टोबर २०२२ रोजी रद्द केलेली असणे, ही कामे नागरिकांच्या हिताची व मुलभूत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सोयी सुविधांची असल्याने ती दिनांक १२ ऑक्टोबर २०२२ रोजी रद्द केल्याने नागरिकांना विकासापासून वंचित राहण्याची वेळ येणे, परंतु सदरची कामे रद्द केल्याने नागरिकांमध्ये शासना विषयी असंतोष निर्माण होणे तरी सदरच्या कामांना पुनःप्रशासकीय मान्यता देणेची असलेली आवश्यकता त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. रोहित पवार** |
| (१२) | ४५२० | १० | सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी माननीय लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मूलभूत सुविधा पुरविणे (लेखाशीर्ष २५१५ १२३८) या योजनेअंतर्गत विकास कामांना मंजुरी देण्याबाबत शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागामार्फत दिनांक १६ जून २०२२ रोजी शासन निर्णय क्रमांक शासन निर्णय-विकास २०२२/ प्रकल्प ५०/ भाग ३/ योजना-६ अन्वये कर्जत जामखेड मतदार संघातील ८ कोटी ६५ लाखाच्या कामांना स्थगिती देण्यात आलेली असून या कामांची निविदा प्रक्रिया सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांच्या माध्यमातून राबविण्यात आलेली आहे, कर्जत जामखेड मतदार संघातील थोर महापुरुषांचे जन्मगाव तसेच प्राचिन ऐतिहासिक तीर्थक्षेत्राच्या ठिकाण च्या विकास कामांचा समावेश करणेत आलेला होता परंतु दिनांक १२ ऑक्टोंबर २०२२ रोजी ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णय क्र.विकास २०२२/प्र. क्र.२२७ योजना -६ अन्वये सदरील कामे रद्द करण्यात आलेली असून सदरील कामांना फेर मंजुरी मिळणेबाबत मा.मुख्यमंत्री यांना दि. २७/०७/२०२२ रोजी जा.क्र.RRP/MUM/2022/270702 नूसार निवेदन देऊन देखील अद्याप मंजुरी मिळालेली नाही. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ४५२६ | १० | सन २०२१-२०२२ ची आर्थिक वर्षासाठी माननीय लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मूलभूत सुविधा पुरविणे (लेखाशीर्ष २५१५ १२३८) या योजनेअंतर्गत विकास कामांना मंजुरी देण्याबाबत शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागामार्फत दिनांक १६ जून २०२२ रोजी शासन निर्णय क्रमांक विकास २०२२ प्र. क्र.५० भाग ३ योजना ६ अन्वये कर्जत जामखेड मतदार संघातील ५ कोटी रकमेच्या विकास कामांनामंजुरी देण्यात आलेली असून दिनांक २७ जून, २०२२ रोजी जिल्हा परिषद अहमदनगर यांचे मार्फत प्रशासकीय मान्यता देखील देण्यात आलेले असून या कामात कर्जत जामखेड मतदार संघातील सामावेशीत गावअंतर्गत मुलभूत सोयी सुविधा पुरवनेसाठीच्या तसेच विकास कामाचा समावेश करणेत आलेला होता परंतु दिनांक १२ ऑक्टोंबर, २०२२ रोजी ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णय क्र.विकास २०२२/प्र. क्र.२२७योजना -६ अन्वये सदरील कामे रद्द करण्यात आलेली आहेत. सदरील कामांना फेर मंजुरी मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. दिलीपराव बनकर** |
| (१४) | ४६०७ | १० | ग्रामीण भागातील मुलभूत सुविधा व विविध विकास कार्यक्रम अंतर्गत लेखाशीर्ष २५१५-१२३८ मध्ये सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात स्थानिक लोकप्रतिनिधींच्या निफाड विधानसभा मतदार संघातील मंजूर कामांना शासनाने दिनांक १९ जुलै २०२२ रोजी स्थगिती दिलेली असणे सदरची कामे ही जनतेच्या मुलभूत सुविधांच्या विकासाची असताना या कामांची स्थागिती न उठविता सदरची कामे शासनाने दिनांक १२ ऑक्टोबर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | २०२२ रोजी रद्द केलेली असणे, ही कामे नागरिकांच्या हिताची व मुलभूत सोयी सुविधांची असल्याने ती दिनांक १२ ऑक्टोबर २०२२ रोजी रद्द केल्याने नागरिकांना विकासापासून वंचित राहण्याची वेळ येणे, परंतु सदरची कामे रद्द केल्याने नागरिकांमध्ये शासना विषयी असंतोष निर्माण होणे तरी सदरच्या कामांना पुनःप्रशासकीय मान्यता देणेची असलेली आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (१५) | ४५६५ | १०० | येवला जि.नाशिक या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे (लेखाशीर्ष २५१५ १२३८) या योजनेअंतर्गत शासन निर्णय क्र. विकास - २०२२/ प्र.क्र. ५०/ योजना-६ दि. ३१ मार्च २०२२ आणि शासन निर्णय क्र. विकास -२०२२/प्र.क्र. ५० / योजना-६ दि. ६ मे, २०१२ या दोन शासन निर्णयान्वये रु. १००० लक्षची विकास कामे मंजूर असणे, मात्र ग्रामविकास विभागाचे पत्र जा.क्र. विकास-२०२२/प्र.क्र.२२७/यो-६ दि. २५ जुलै, २०२२ अन्वये ही कामे स्थगित झालेली असणे, स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि. २० ऑगस्ट २०२२ रोजी निवेदनाद्वारे या विकासकामांना दिलेली स्थगिती रद्द करून निधी मंजूर करण्याची मागणी केलेली असणे, येवला जि.नाशिक या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधांसाठी या कामांची नितांत गरज असल्यामुळे सदर कामांची स्थगिती रद्द करून निधी उपलब्ध करून देणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. बळवंत वानखडे,अॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (१६) | ४६०२ | १० | ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा व विविध विकास कार्यक्रमांसाठी दर्यापूर , अंजनगाव आणि अचलपूर या तालुक्यातील ग्रामीण भागात मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रत्येक तालुक्यासाठी २५ कोटी रुपये निधीची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**बाब क्रमांक: २२८, रूपये:- १०,००,००,००,०००/-**<br>**अॅड. माणिकराव कोकाटे** |
| (१७) | ४६११ | १०० | जिल्हा परिषदेअंतर्गत येणाऱ्या ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांच्या दुरुस्ती लेखाशीर्ष ३०५४-२४१९ रस्ते व पूल परिरक्षण या अंतर्गत गट ब मधील सिन्नर मतदार संघातील कामांना ३१ मार्च २०२१ रोजी शासनस्तरावरून प्रशासकीयमान्यता प्रदान केलेली असणे, सदर कामांना दिनांक १९ जुलै २०२२ रोजी शासनाच्या ग्रामविकास विभागाने स्थगिती दिलेली असणे, सदरची कामे ही मतदार संघातील नागरिकांच्या हिताची व दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असणे त्यामुळे नागरिकांना विकासापासून वंचित राहण्याची वेळ येणे, सदरची कामे ही शासनाने स्थगिती दिल्याने नागरिकांमध्ये शासनाविषयी प्रचंड असंतोष निर्माण होणे, त्यामुळे सदरच्या कामांवरील स्थगिती उठवून या कामांना निधी उपलब्ध करून देणेची असलेली आवश्यकता त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. अजित पवार,श्री. सुनिल भुसारा** |
| (१८) | ४६४९ | १०० | ''पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात आरोग्याच्या आणि रस्ता इत्यादी सुविधांचा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|

अभाव असून रस्ता नसल्यामुळे जुळया मुलांचा मृत्यू तसेच गर्भवती महिलेला रुग्णालयात दाखल करण्यासाठी डोली करून तीन किलोमीटर पायपीट करण्याची वेळ आल्याच्या घटना येथे घडलेल्या असणे, मोखाडा तालुक्यातील एका गर्भवती मातेला उपचारासाठी तीन किलोमीटर पायपीट करावी लागल्यामुळे पायपीटीतच डोलीमध्ये या मातेने बाळाला जन्म दिलेला असणे, अशा प्रकारच्या घटनांमुळे आदिवासींचे जगणे मुश्किल झालेले असणे, यासंदर्भात ग्रामविकास विभागामार्फत तातडीने आदिवासी भागात रस्ते इत्यादि मूलभूत सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे करिता करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना."

**श्री. नितीन अर्जुन (ए.टी.) पवार**

(१९) ४६१३ १०० जिल्हा परिषदेअंतर्गत येणाऱ्या ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांच्या दुरुस्ती लेखाशीर्ष ३०५४-२४१९ रस्ते व पूल परिरक्षण या अंतर्गत गट ब मधील कळवण-सुरगाणा मतदार संघातील कामांना ३१ मार्च २०२१ रोजी शासनस्तरावरून प्रशासकीयमान्यता प्रदान केलेली असणे, सदर कामांना दिनांक १९ जुलै २०२२ रोजी शासनाच्या ग्रामविकास विभागाने स्थगिती दिलेली असणे, सदरची कामे ही मतदार संघातील नागरिकांच्या हिताची व दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असणे त्यामुळे नागरिकांना विकासापासून वंचित राहण्याची वेळ येणे, सदरची कामे ही शासनाने स्थगिती दिल्याने नागरिकांमध्ये शासनाविषयी प्रचंड असंतोष निर्माण होणे, त्यामुळे सदरच्या कामांवरील स्थगिती उठवून या कामांना निधी उपलब्ध करून देणेची असलेली आवश्यकता त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही.

**पूरक मागणी क्रमांक: एल-३**
**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**
**बाब क्रमांक: २२८, रूपये:- १,००,००,००,०००/-**
**श्री. कुणाल पाटील**

(२०) ४६७७ १० धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील फागणे ते आर्णी रस्त्याची अत्यंत मोठ्या प्रमाणावर दूरावस्था झालेली असून या रस्त्यावरून येता जातांना शेतकरी व परिसरातील नागरिकांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे. परिणामी सदर रस्त्याचे डांबरीकरण व नूतनीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली आहे. सदर मागणी लक्षात घेता फागणे ते आर्णी रस्त्याचे डांबरीकरण व नूतनीकरण करण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना.

**पूरक मागणी क्रमांक: एल-३**
**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**
**बाब क्रमांक: २२८, रूपये:- १,००,००,००,०००/-**
**श्री. कुणाल पाटील**

(२१) ४६८१ १० धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील कौठळ ते कापडणे रस्त्याची अत्यंत मोठ्या प्रमाणावर दूरावस्था झालेली असून या रस्त्यावरून येता जातांना शेतकरी व परिसरातील नागरिकांना आतोनात त्रास सहन करावा लागत आहे. परिणामी सदर रस्त्याचे डांबरीकरण व नूतनीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेली मागणी सदर मागणी लक्षात घेता, कौठळ ते कापडणे रस्त्याचे डांबरीकरण व नूतनीकरण करण्याबाबत

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. दिलीपराव बनकर** |
| (२२) | ४६१० | १०० | जिल्हा परिषदेअंतर्गत येणाऱ्या ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांच्या दुरुस्ती लेखाशीर्ष ३०५४-२४१९ रस्ते व पूल परिरक्षण या अंतर्गत गट ब मधील निफाड मतदार संघातील कामांना ३१ मार्च २०२१ रोजी शासनस्तरावरून प्रशासकीयमान्यता प्रदान केलेली असणे, सदर कामांना दिनांक १९ जुलै २०२२ रोजी शासनाच्या ग्रामविकास विभागाने स्थगिती दिलेली असणे, सदरची कामे ही मतदार संघातील नागरिकांच्या हिताची व दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असणे त्यामुळे नागरिकांना विकासापासून वंचित राहण्याची वेळ येणे, सदरची कामे ही शासनाने स्थगिती दिल्याने नागरिकांमध्ये शासनाविषयी प्रचंड असंतोष निर्माण होणे, त्यामुळे सदरच्या कामांवरील स्थगिती उठवून या कामांना निधी उपलब्ध करून देणेची असलेली आवश्यकता त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (२३) | ४५६७ | १०० | येवला व निफाड (जि. नाशिक) तालुक्यातील ग्रामीण मार्गाची सुधारणा करणेसाठी लोकप्रतिनिधीनी दि ८ जून २०२२ रोजी शासनाकडे मागणी केलेली असणे, या भागातील रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे सदर रस्त्यांच्या सुधारणेसाठी निधीची नितांत आवश्यकता असणे ३०५४ रस्त्यांची सुधारणा या योजनेतून सदर रस्त्यांसाठी निधी मंजूर करण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे,ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (२४) | ४६०१ | १० | अमरावती जिल्हा विस्ताराने खूप मोठा असून जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गांची लांबी मोठ्या प्रमाणात आहे. परंतु सदर रस्त्यांची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी जिल्हा वार्षिक व इतर योजनेतून अत्यंत कमी प्रमाणात निधी उपलब्ध होत असल्याने मोठ्या प्रमाणात रस्ते खराब झाले आहेत. सदर रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीचा प्रस्ताव जिल्हा परिषद अमरावती मार्फत शासनास सादर असून सदर प्रस्तावास मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावा. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (२५) | ४४९७ | १० | मौजे धामापूर (खालचावाडा)-बौध्दवाडी-भाटीवाडी मार्गे आंबेरी (तालुका-मालवण, जिल्हा-सिंधुदुर्ग) या 6.5 कि.मी. लांबीच्या ग्रामीण मार्ग क्रमांक-402 रस्त्याच्या मजबूतीकरणासह-डांबरीकरणासाठी शासनाने माहे डिसेंबर, 2021 अखेर रुपये 430.35 लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देणे, सदर रस्त्याच्या सा.क्र.0/00 ते 1/500 मधील रस्ता दुरुस्तीचे काम जि.प.च्या विविध योजनांतर्गत प्राधान्याने प्रस्तावित करुन पूर्ण करण्याबाबत जिल्हापरिषद, सिंधुदुर्ग (सा.बा.विभाग) यांना मा.सा.बा.मंत्री यांनी सूचना देणे, परंतु जि.प.सिंधुदूर्गने रस्त्याच्या सा.क्र.0/00 ते 1/500 मधील रस्ता दुरुस्तीचे डांबरीकरणाचे काम अद्यापपर्यंत हाती न घेतल्याने रेती वाहून नेणाऱ्या डंपरच्या वाहतूकीने संपूर्ण रस्त्यात खड्डे पडून वाहतूकीस खराब होणे, सन 2018, 2019, 2020, 2021 व 2022 या चार वर्षामध्ये झालेल्या जोरदार अतिवृष्टीने या रस्त्याला ठिकठिकाणी खड्डे, खाचखळगे पडलेले असल्याने रहिवाश्यांना या रस्त्याने चालणे, वाहन चालवणे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | धोकादायक झालेले आहे. दोन्ही गावांतील ग्रामस्थांनी मागील काही वर्षापासून सातत्याने ह्या रस्त्याचे मजबूतीकरणासह-डांबरीकरणाचे काम पूर्ण करुन या मार्गाने एस.टी.बस वाहतुक सुविधा उपलब्ध करुन देण्याची मागणी मा.पालकमंत्री, मा.सा.बां.मंत्री, मा.परिवहन मंत्री, मा.जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग/मा.अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, रत्नागिरी/कार्यकारी अभियंता, सा.बा.उपविभाग, सावंतवाडी आदींकडे सातत्याने करणे, शासनाचे ग्रामिण रस्ता म्हणून जाणीवपूर्वक झालेले व होत असलेले सततचे दुर्लक्ष, संपूर्ण रस्ता वाहतुकीस अयोग्् झाल्याने या भागातील नागरीकांना चांगल्या रस्त्याअभावी सोसाव्या लागणाऱ्या दळणवळणाच्या गंभीर समस्या, हा रस्ता धामापूर-आंबेरी गावांतील नागरीकांचा रहदारीचा मुख्य् मार्ग असल्याने चांगल्या रस्त्याअभावी अनेक अडचणींनी या भागातील नागरीक हैराण होणे, त्याच्यामध्ये पसरलेली तिव्र् संतापाची लाट, या संपूर्ण रस्त्याचे डांबरीकरणाचे काम तातडीने हाती घेवून या मार्गाने एस.टी.वाहतूक सुविधा उपलब्ध् करुन देण्यासाठी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ०३०५४, मार्ग व पूल**<br>**बाब क्रमांक: २२९, रूपये:- ३,००,००,००,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (२६) | ४७२३ | १० | बुलडाणा जिल्ह्यातील नांदुरा व मलकापूर तालुक्यात झाल्यामुळे अतिवृष्टीमुळे ग्रामीण भागातील रस्त्यांची अक्षरशः चालन झालेली आहे, रस्त्याची चाळण झाल्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी व नागरिकांना खराब झालेल्या रस्त्यांमुळे प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे, त्यामुळे नागरिकांनी वारंवार स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे रस्त्याची दुरुस्तीची मागणी केलेली असताना लोकप्रतिनिधी यांनी सुद्धा शासनाकडे वारंवार रस्त्याच्या दुरुस्तीबाबत तक्रार करणे. परंतु शासनाकडून कुठलीही प्रतिक्रिया आलेली नसल्याने शासनाप्रती नागरिकांमध्ये रोष व्यक्त झालेला आहे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना. |
| | | | **ॲड. माणिकराव कोकाटे** |
| (२७) | ४६१६ | १० | अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे खराब झालेल्या ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची दुरुस्ती लेखाशीर्ष ३०५४ अंतर्गत दुरुस्ती च्या कामांसाठी ३००००००००० निधीची तरतूद करण्यात आलेली असून माझ्या सिन्नर (जि. नाशिक) मतदार संघात माहे जुलै ते माहे ऑक्टोबर २०२२ पावेतो मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी (ढग फुटी) झाल्याने मतदार संघातील ग्रामीण रस्ते व इतर जिल्हा मार्ग रस्ते पुराच्या पाण्याने वाहून गेलेले असल्याने रस्त्यांची अतिशय दुरावस्था झालेली आहे त्यामुळे नागरिकांना दळणवळणचा मोठा पेच निर्माण झाला आहे. पावसाळा संपुष्टात येऊन जवळपास २ महिन्यांचा कालावधी लोटला गेला असून देखील रस्त्यांची डागडुजी व दुरुस्ती करणेत आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये शासनाविषयी तीव्र असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांचे दळणवळण सुरळीत होणाच्या दृष्टीकोनातून या रस्त्यांचे तातडीने नुतनीकरण करणे गरजेचे असणे यासाठी शासनाने जास्तीचा निधी उपलब्ध करून देनेची असलेली आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. नितीन अर्जुन (ए.टी.) पवार** |
| (२८) | ४६१५ | १० | अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे खराब झालेल्या ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची दुरुस्ती लेखाशीर्ष ३०५४ अंतर्गत दुरुस्ती च्या कामांसाठी ३००००००००० निधीची तरतूद करण्यात आलेली असून स्थानिक लोकप्रतिनिधी कळवण-सुरगाणा (जि. नाशिक) मतदार संघात माहे जुलै ते माहे ऑक्टोबर २०२२ पावेतो मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी (ढग फुटी) झाल्याने मतदार संघातील ग्रामीण रस्ते व इतर जिल्हा मार्ग रस्ते पुराच्या पाण्याने वाहून गेलेले असल्याने रस्त्यांची अतिशय दुरावस्था झालेली आहे त्यामुळे नागरिकांना दळणवळणचा मोठा पेच निर्माण झाला आहे. पावसाळा संपुष्टात येऊन जवळपास २ महिन्यांचा कालावधी लोटला गेला असून देखील रस्त्यांची डागडुजी व दुरुस्ती करणेत आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये शासनाविषयी तीव्र असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांचे दळणवळण सुरळीत होणाच्या दृष्टीकोनातून या रस्त्यांचे तातडीने नुतनीकरण करणे गरजेचे असणे यासाठी शासनाने जास्तीचा निधी उपलब्ध करून देनेची असलेली आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. दिलीपराव बनकर** |
| (२९) | ४६१४ | १० | अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे खराब झालेल्या ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची दुरुस्ती लेखाशीर्ष ३०५४ अंतर्गत दुरुस्ती च्या कामांसाठी ३००००००००० निधीची तरतूद करण्यात आलेली असून माझ्या निफाड (जि. नाशिक) मतदार संघात माहे जुलै ते माहे ऑक्टोबर २०२२ पावेतो मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी (ढग फुटी) झाल्याने मतदार संघातील ग्रामीण रस्ते व इतर जिल्हा मार्ग रस्ते पुराच्या पाण्याने वाहून गेलेले असल्याने रस्त्यांची अतिशय दुरावस्था झालेली आहे त्यामुळे नागरिकांना दळणवळणचा मोठा पेच निर्माण झाला आहे. पावसाळा संपुष्टात येऊन जवळपास २ महिन्यांचा कालावधी लोटला गेला असून देखील रस्त्यांची डागडुजी व दुरुस्ती करणेत आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये शासनाविषयी तीव्र असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांचे दळणवळण सुरळीत होणाच्या दृष्टीकोनातून या रस्त्यांचे तातडीने नुतनीकरण करणे गरजेचे असणे यासाठी शासनाने जास्तीचा निधी उपलब्ध करून देण्याची असलेली आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे,ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (३०) | ४६०० | १० | जिल्हा परिषद अमरावतीच्या अखत्यारीत येणाऱ्या इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग अशा सुमारे ५७३ किलोमीटरचे रस्ते तसेच १७५ पूलांचे अतिवृष्टीने नुकसान झाले आहे. जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाला रस्त्याच्या दुरुस्तीकरिता आतापर्यंत सुमारे १६९ कोटी ७० लक्ष रुपयांचे निधी मागणीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला असून सादर प्रस्तावास निधीसाह मान्यता देण्यात यावी. |

**पूरक मागणी क्रमांक: एल-७**

**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **बाब क्रमांक: २३२, रूपये:- १२,७६,७७,०००/-** |
| | | | **श्री. मनोहर चंद्रिकापूरे** |
| (३१) | ४६६७ | १० | अर्जुनी मोरगांव विधानसभा क्षेत्र गोंदिया हा ग्रामीण विधानसभा क्षेत्र असणे, मागास मतदार संघ असने, या मतदार संघात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेकरिता सुविधा व विकास कामांसाठी निधी अपुरा पडत असणे, ५०५४ लेखाशिर्ष अंतर्गत निधीची आवश्यकता असणे वारंवार मागणी करुनही निधी न मिळणे, त्यमुळे मतदार संघात असमतोल विकास होणे, तथापी तात्काळ ५०५४ अंतर्गत निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (३२) | ४४९९ | १० | मौजे तुळस (काजरमळी)-वडखोल मार्गे वेंगुर्ला (तालुका-वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदूर्ग) ग्रा.मा.क्र.109 मा.मुख्यमंत्री ग्रामसडक योजना 2018-2019 अंतर्गत मजबूतीकरणासह-डांबरीकरणाच्या कामासाठी शासनाने 129.28 लक्ष निधी मंजूर करुन देणे, सदर रस्त्यासाठी वापरण्यांत आलेली खडी व डांबर निकृष्ट् दर्जाचे वापरल्याने तसेच, रस्त्याच्या दोन्ही बाजूने पाणी वाहून जाण्यासाठी गटर खोदलेले नसल्याने जोरदार अतिवृष्टीने रस्त्यात खडे पडलेले असणे, या मार्गाकडे शासनाचे ग्रामिण रस्ता म्हणून जाणीवपूर्वक झालेले व होत असलेले अक्षम्यृ दुर्लक्ष, संपूर्ण रस्ता वाहतुकीस अयोग्य् झाल्याने या भागातील नागरीकांना चांगल्या रस्त्याअभावी सोसाव्या लागणाऱ्या दळणवळणाच्या गंभीर समस्या, सदरचा रस्ता या भागातील नागरीकांचा रहदारीचा मुख्य् मार्ग असल्याने चांगल्या रस्त्याअभावी अनेक अडचणींनी या भागातील नागरीक हैराण होणे, त्याच्यामध्ये पसरलेली संतापाची लाट, या संपूर्ण रस्त्याचे डांबरीकरणाचे काम तातडीने हाती घेवून या मार्गाने एस.टी.वाहतूक सुविधा उपलब्ध् करुन देण्यासाठी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : २१ डिसेंबर, २०२२**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) ग्रामविकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर